Google ला सर्च करा
गुरुमाऊली

# माझा अभ्यास
Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी ( 2 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस तेहतीस : ☞ CLICK HERE



गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

# वाचा व समजून घ्या.

## ६. मायेची पाखर



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल मला अत्यंत आदर आहे. एकदा मी पुण्याला जाताना वाटेत सातारला थांबलो. भाऊरावांना भेटावे म्हणून त्यांच्याकडे गेलो. त्यांची भेट झाली. मला खूप समाधान वाटले.

सर्वजण भाऊरावांना अण्णा म्हणत असत. अण्णांनी मला संस्था दाखवण्यासाठी नेले. संस्था पाहून झाली. अंधार पडला, रात्र झाली. 'आता इथंच मुक्काम करा!' अण्णांनी मला आग्रह केला. अण्णांचा तो आग्रह ! नाही कसे म्हणायचे ? राहिलो झाले तिथे.

मी संस्थेचा परिसर पाहत निघालो. संस्थेच्या आवारात एक मोठे वडाचे झाड होते. आजूबाजूलाही गर्द झाडी होती. थंडीचे दिवस होते. कडाक्याची थंडी पडली होती. मुले पत्र्याच्या खोल्यांतून राहत होती. पत्र्यांनी बनवलेल्या अशाच एका खोलीत अण्णा बसलेले होते. मीही त्यांच्याजवळ जाऊन बसलो. त्यांनी मला जेवणाचा आग्रह केला.

'नुकतंच जेवण झालंय माझं,' असे मी त्यांना सांगितले. अर्थात हे सर्व खोटेच होते. वसतिगृहाच्या मुलांनी केलेले जेवण ते कसे असणार ! म्हणून मी जेवणाची टाळाटाळ केली.

मुलांची जेवणे झाली, प्रार्थना झाली आणि ती सर्व झोपी गेली. माझ्या पोटात मात्र कावळे ओरडत होते. मग मला झोप कशी येणार ? मी तसाच पडून राहिलो.

अण्णांनी हे ओळखले. त्यांनी एका मुलाला आज्ञा केली, "जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू !" मुलगा धावतच स्वयंपाकघरात गेला. पिठले, भाकरी, कांदा, तेल एका ताटात घेऊन आला. मी अधाश्यासारखा त्यावर तुटून पडलो. पंचपक्वान्नांपेक्षाही ते मला रुचकर लागले. मग काय, बिछान्यावर पडल्या पडल्याच डोळा लागला. मध्यरात्र उलटून गेली. कशाची तरी चाहूल लागून मला जाग आली. अण्णा उठले होते. त्यांनी कंदील हातात घेतला. प्रत्येक मुलाला झोप लागली की नाही, त्याच्या अंगावर पांघरूण आहे की नाही ते अण्णा पाहू लागले. त्यांनी पाहिले, की एक मुलगा थंडीने कुडकुडत आहे. अण्णा त्याच्याजवळ गेले. त्यांनी त्याला आपल्या दोन्ही हातांनी अलगत उचलले. स्वतःच्या बिछान्यावर आणून झोपवले. स्वतःची कांबळी त्याच्या अंगावर घातली. त्याला अगदी आपल्या पोटाशी धरले. त्या उबेत तो मुलगा गाढ झोपी गेला.

त्या मुलांपैकी कितीतरी जणांना आई नव्हती. कितीतरी जणांना वडील नव्हते; पण अण्णांनी त्यांच्यावर पित्याच्या प्रेमाचा आणि मातेच्या मायेचा वर्षाव केला होता. अशी होती अण्णांच्या मायेची पाखर. हे सर्व मी उघड्या डोळ्यांनी पाहिले.

टेस्ट सोडवा

## २. संख्याज्ञान

### संख्या वाचा व अक्षरात लिहा.

सुरेश : हो ताई, ते कसं लिहितात ?

ताई : आपण १, २, ३, ... , १० असं लिहितो, ते कानडीत कसं लिहितात ते पाहा.

೧ ೨ ೩ ೪ ೫ ೬ ೭ ೮ ೯ ೧೦

मग नोटांवर १, २, ३ असे अंक लिहिले तर ते त्यांना कसे समजतील ?

विजया : आणि त्यांच्यासारखे लिहिले तर आपल्याला नाही कळणार !

ताई : बरोबर. म्हणजे नोटांवरील संख्या अशा लिहिल्या पाहिजेत, की त्या भारतातील सगळ्या लोकांना समजतील. एवढंच नाही, तर परदेशातून आपल्या देशात येणाऱ्यांनाही समजतील.

सुरेश : मग आपण दुसऱ्या देशात गेलो, तर आपल्यालाही तिथल्या नोटांवरच्या संख्या कळायला हव्या.

ताई : अगदी बरोबर ! म्हणूनच जगातल्या सगळ्या देशांनी असं ठरवलं आहे, की नोटांच्या किमती, त्यांचे क्रमांक; आगगाडीच्या, बसच्या व विमानाच्या तिकिटांचे क्रमांक असं सगळं इंग्रजी अंकांत छापायचं.

विजया : म्हणूनच आपल्याकडे बस, रिक्षा यांचे क्रमांक इंग्रजीत लिहीत असले पाहिजेत. आता आलं लक्षात !

ताई : हो ना ! संख्या इंग्रजी अंक वापरून लिहिल्या, की जगातल्या सगळ्या लोकांना समजतात, म्हणून इंग्रजी अंकांनाच आता 'आंतरराष्ट्रीय अंक' म्हणतात. हे अंक तुम्हांला माहीत आहेत. पुढील इयत्तांमध्ये तुम्हांला हेच अंक वापरायचे आहेत.

| देवनागरी संख्याचिन्हे | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

| देवनागरी संख्याचिन्हांत | ४९७ | २३५ | ४३७ | ५६८ | ६७२ | ७९९ | ८०० | ९१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हांत | 497 | 235 | 437 | 568 | 672 | 799 | 800 | 912 |

### संख्यांचे वाचन व अक्षरांत लेखन

4536 याचे वाचन 'चार हजार पाचशे छत्तीस' असे करतात.

27,105 याचे वाचन 'सत्तावीस हजार एकशे पाच' असे करतात.

64,089 याचे वाचन 'चौसष्ट हजार एकोणनव्वद'असे करतात.

### स्वाध्याय

१. खालील संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

(१) 20,504 (२) 97,487 (३) 30,008 (४) 4,879 (५) 6,405 (६) 893

२. आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे तुम्ही कोठे कोठे बघितली आहेत, ते लिहा.

३. वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय अंकांत लिहिलेल्या किमती पाहा व वाचा.

- Read numbers and write in letters.

## 2. Number Work

**Suresh** : How do they write them?

**Tai** : In Marathi we write १, २, ३, ...१०. This is how they write : ೧ ೨ ೩ ೪ ೫ ೬ ೭ ೮ ೯ ೧೦. So, if we had १, २, ३ on our currency notes, how would they read them?

**Vijaya** : And if the numerals were like theirs, we wouldn't be able to read them!

**Tai** : That's right. It means that the numbers on currency notes should be such that everyone in India can read them. And, not only Indians, but visitors from other countries should also be able to read them.

**Suresh** : Yes, I agree. Because, if I had to go to another country, I would like to be able to read the numbers on their notes.

**Tai** : Well said! That's why all the countries of the world have agreed that numbers that tell the values of currency notes or their serial numbers should all be printed in English. So also other numbers such as the serial numbers of train tickets or bus and airline tickets.

**Vijaya** : Now I understand! That must be the reason why all over our country too, bus and rickshaw numbers are written in English.

**Tai** : When numbers are written using English numerals, everyone in the world can understand them. That is why these numerals are now called 'international numerals'. You are already familiar with them.

| Devanagari numerals | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| International numerals | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

| Devanagari numerals | ४९७ | २३५ | ४३७ | ५६८ | ६७२ | ७९९ | ८०० | ९१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| International numerals | 497 | 235 | 437 | 568 | 672 | 799 | 800 | 912 |

### Reading numbers and writing them in words

**4536** is read as, 'Four thousand, five hundred and thirty-six'.
**27,105** is read as, 'Twenty-seven thousand, one hundred and five'.
**64,089** is read as, 'Sixty-four thousand and eighty-nine'.

### Exercise

1. Read the numbers given below and write them in words.
   (1) 20,504 (2) 97,487 (3) 30,008 (4) 4,879 (5) 6,405 (6) 893
2. Where have you seen international numerals being used ?
3. Find prices of things written in Devanagari numerals and read them.

Row your boat.

Unit Two

टेस्ट सोडवा

## Listen and understand.

**1. Listen, repeat. Read aloud and sing.**
कविता ऐका, म्हणा. मोठ्याने वाचा आणि चालीवर म्हणा.



Row, row, row your boat
Gently down the stream,
Merrily, merrily, merrily, merrily.
Life is but a dream.

'रोऽ 'रोऽ 'रोऽ यॉऽर् 'बोऽट्
'जेन्ट्लि 'डाउन् द 'स्ट्रीम्
'मेरिलि 'मेरिलि 'मेरिलि 'मेरिलि
'लाइफ् इझ् 'बट् अ 'ड्रीम्

**2. Tell other words that rhyme with the following words.**
खालील शब्दांशी यमक जुळणारे इतर शब्द सांगा.

* row * boat * down * stream * life * but

हे इंग्रजीतील एक लोकप्रिय गाणे आहे. वर्गाचे चार गट करावे. प्रथम फक्त पहिल्या गटाने कविता म्हणायला सुरुवात करावी. त्यांची पहिली ओळ म्हणून झाली, की दुसऱ्या गटाने कविता सुरू करावी. त्यांची पहिली ओळ म्हणून झाली की, तिसऱ्या गटाने सुरू करावी. त्यांची पहिली ओळ म्हणून झाल्यावर चौथ्या गटाने सुरू करावी. पहिल्या गटाची संपूर्ण कविता म्हणून झाल्यानंतर पहिल्या गटापासून कविता म्हणायचे क्रमाने थांबवत जावे.


पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ४. पिण्याचे पाणी

### करून पहा

- एका काचेच्या ग्लासमध्ये अर्ध्यापर्यंत पाणी घ्या. त्यात एक चमचा साखर टाकून चमच्याने ढवळा. काय बदल होतो ते पहा.



- असा प्रयोग पुढील प्रत्येक पदार्थ घेऊन करा. मीठ, मध, धुण्याचा सोडा, तुरटीची पूड, वाळू, गव्हाचे पीठ, लाकडाचा भुसा, हळदपूड, थोडे तेल.
- प्रत्येक नवीन पदार्थ घेण्यापूर्वी ग्लास स्वच्छ धुऊन घ्या.

**तुम्हांला काय आढळून येईल?**

साखर, मीठ, धुण्याचा सोडा, तुरटीची पूड हे पदार्थ पाण्यात टाकून ढवळल्यावर दिसेनासे झाले. ते पाण्यात पूर्णपणे विरघळले. परंतु वाळू, गव्हाचे पीठ, लाकडाचा भुसा, हळदपूड, तेल या पदार्थांचे तसे नाही. ढवळल्यावरही ते पाण्यात तसेच राहिले. विरघळले नाहीत.

**यावरून काय उलगडते ?**

काही पदार्थ पाण्यात विरघळतात, तर काही पदार्थ विरघळत नाहीत.

**विरघळलेला पदार्थ भांड्यातील संपूर्ण पाण्यात पसरतो. मीठ पाण्यात विरघळले, की भांड्यातील पाणी चवीला खारट लागते. साखर विरघळली की पाणी गोड लागते.**

**नवा शब्द शिका**

**द्रावण :** पाण्यात एखादा पदार्थ विरघळला, की पाणी व त्या पदार्थाचे मिश्रण तयार होते. या मिश्रणाला पदार्थाचे द्रावण म्हणतात.



एखाद्याला जुलाब आणि उलट्या होऊ लागल्या, तर आपण त्याला पाण्यात साखर आणि मीठ विरघळवून तयार केलेले द्रावण प्यायला देतो. या द्रावणाला जलसंजीवनी म्हणतात.


इस्पितळात रुग्णाला ‘सलाइन’ देतात. सलाइन म्हणजे मिठाचे द्रावण. काही वेळा त्यातच इतर औषधेही विरघळवून रुग्णाला देतात.

ही उपयुक्त द्रावणांची उदाहरणे आहेत.

# ४. शिवरायांचे बालपण

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.



सवंगड्यांसोबत शिवराय

चणे हे त्यांचे छंद ! लपंडाव, चेंडू, भोवरा हे यांचे नेहमीचे खेळ. शिवरायही त्या मुलांबरोबर : खेळ खेळत. मावळ्यांच्या मुलांना शिवराय ारफार आवडायचे.

**शहाजीराजे मुघल बादशाहीकडे :** ाहाजीराजे निजामशाहीत परतले खरे, पण यांना तिथे स्वास्थ्य मिळाले नाही, कारण खुद्द ेजामशाहाच हलक्या कानाचा व धरसोड ृत्तीचा होता. त्यामुळे दरबारात कारस्थाने व ेवादावे यांना ऊत आला होता. त्यातून निजाम- ााहाच्याच चिथावणीने लखुजीराव जाधवांची र दरबारात हत्या करण्यात आली. या घटनेची ीड येऊन शहाजीराजांनी निजामशाहीचा त्याग ेला आणि ते मुघलांच्या सेवेत रुजू झाले. मुघल ादशाहा शाहजहानने त्यांना आपली सरदारकी बहाल केली.

दरम्यान वजीर फत्तेखानाने मुघलांशी आतून हातमिळवणी करून निजामशाहाचीच हत्या केली. निजामशाहीत अंदाधुंदी माजली. फत्तेखान फितुरीने निजामशाही मुघलांच्या घशात घालणार हे स्पष्ट झाले. एवढेच नव्हे, तर त्याची बक्षिसी म्हणून शहाजीराजांच्या ताब्यात असणारा मुलूख मुघलांनी त्याला परस्पर देऊन टाकला, तेव्हा शहाजीराजांनी संतापून मुघलांची बाजू सोडली आणि आपल्या सामर्थ्याच्या जोरावर मुघलांना धडा शिकवण्याचा निश्चय केला.

**नव्या निजामशाहीची स्थापना :** वजीर फत्तेखानास व मुघल बादशाहास शह देण्यासाठी शहाजीराजांनी निजामाच्या वंशातील एक मूल शोधून काढले आणि जुन्नरजवळच्या पेमगिरी

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here